संकल्प/ निश्चय

संकल्प, निश्चय अशा जड आणि अवघड विषयावर खर काय बोलणार, जाणकारांनी इतकं सांगून ठेवलंय, पण संकल्प इतका दृढ असावा आणि निश्चयाने पण ठाम असावं की कितीही प्रलोभने किंवा आव्हाने असोत, विपरीत परिस्थिती असो, मुख्य कार्य थांबले नाही पाहिजे.
आजकाल इतके आजार आणि व्हायरल ताप आलेत, पण डॉक्टरच्या खोली बाहेर रुग्णांचे क्रम लिहून घेणारा तो किंवा ती, कितीही व्हायरल आणि तापाचे रुग्ण आले तरी त्यांना कधी फार शिंकताना, खोकताना पाहिलं जातं नाही आपली जबाबदारी ते अगदी ठामपणे पूर्ण करीत असतात. त्यांना असल्या गोष्टींचा तिळमात्र त्रास होत नाही. अगदी साध्या भाषेत तसं काहीसं असावं.

स. पु.
www.saarthbodh.com
सचिन पुरुषोत्तम कुलकर्णी